CR1997053107

सेवानिवृत्त होणा-या शासकीय कर्मचा-यांना निवृत्तिवेतनविषयक लाभ वेळेवर अदा करण्याबाबत.

अभिलेखागार आयुक्त आणि संचालक
मुंबई अभिलेख (म. रा.) पुणे
संकलन 313
दिनांक 19 AUG 1997
क्रमांक 3392

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन परिपत्रक क्रमांकः सेनिवे-1097/27/सेवा-4,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 31 मे 1997.

## परिपत्रक

सेवानिवृत्त होणा-या शासकीय कर्मचा-याचे निवृत्तिवेतनविषयक लाभ वेळेवर प्रदान केले जावेत यासाठी शासनाने वेळोवेळी सर्व संबंधितांना सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. तथापि, ब-याच कार्यालयांकडून या सूचनांचे योग्यरित्या पालन केले जात नाही.

अलिकडेच मा.लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांनी आपल्या 23 व्या एकत्रित वार्षिक अहवालातील प्रकरण 3 परिच्छेद 2 मध्ये या संदर्भात असे स्पष्ट केले आहे की, "कोणत्याही प्रकरणी, सेवानिवृत्त होणा-या शासकीय कर्मचा-यास त्याच्या सेवानिवृत्तिनंतर वाजवी वेळेत सर्व निवृत्तिवेतनविषयक लाभ मिळण्यापासून वंचित ठेवता येणार नाही. तसे झाल्यास अशा विलंबित रकमांवर व्याज देण्याबाबत त्यांच्याकडून केली जाणारी मागणी न्याय्य ठरेल. ब-याच प्रकरणी सेवानिवृत्ति उपदान/मृत्यू उपदान यांच्या रकमा तसेच इतर निवृत्तिवेतनविषयक लाभ प्रदान करण्यात आलेले नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. अशा प्रकरणी विलंबित रकमेवर व्याज देण्याचा खर्च अंतिमतः शासनास सोसावा लागत असल्यामुळे शासनाने यासंदर्भात सर्व विभागांना सुस्पष्ट सूचना द्याव्यात."

याद्वारे सर्व कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुखांना पुन्हा असे निदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी निवृत्तिवेतनविषयक लाभांच्या प्रकरणांना प्राधान्य द्यावे व अशी प्रकरणे विलंब न होता लवकरात लवकर निकाली काढली जातील याविषयी सर्वतोपरी दक्षता घ्यावी. यादृष्टीने, निवृत्तिवेतन व उपदान प्रत्यक्ष देण्याच्या व प्राधिकृत करण्याच्या विविध कार्यपध्दतीबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 मधील प्रकरण 10 मध्ये विहित केलेले वेळापत्रक पाळले जाईल, त्याचप्रमाणे, यापूर्वी शासनाने, वेळोवेळी प्रसृत केलेल्या आदेशाद्वारे निर्देशित केलेल्या विहित कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन केले जाऊन निवृत्तिवेतनविषयक कागदपत्र विहित नमुन्यात सर्वबाबतीत यथोचितरित्या पूर्ण करून शासकीय कर्मचा-याच्या सेवानिवृत्तिच्या तारखेच्या सहा महिने अगोदर महालेखापालांच्या कार्यालयाकडे पाठविले जातील तसेच महालेखापालांच्या कार्यालयाच्या संपर्कात सातत्याने राहून त्यांच्याकडून प्राधिकार पत्रे वेळीच निर्गमित केली जातील तसेच संबंधित कोषागारातून सेवानिवृत्त कर्मचा-यांना निवृत्तिवेतनविषयक लाभ प्रत्यक्षात वेळेवर प्रदान केले जातील, या सर्व बाबतीत कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख यांनी दक्ष राहणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सेवानिवृत्त होणा-या शासकीय कर्मचा-यास निवृत्तिवेतनविषयक लाभ प्रदान करण्यास विनाकारण विलंब झाला तर संबंधित कार्यालय प्रमुखावर जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुध्द त्वरित शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी. त्याशिवाय त्यांच्या गोपनीय अहवालात - "निवृत्तिवेतनाची प्रकरणे निकालात काढण्यास अक्षम्य दिरंगाई झाल्याने शासनास व्याजापोटी आर्थिक झळ बसण्यास जबाबदार आहेत" - अशा प्रकारची नोंद घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वसंत चौधरी,
शासनाचे अवर सचिव.

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-1, महाराष्ट्र, मुंबई (80 प्रती),

रोटा/एच-495(13,000+40-6-97)

(कृ.मा.प.)

महालेखापाल (लेखा परीक्षा)-1, महाराष्ट्र, मुंबई (80 प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-2, महाराष्ट्र, नागपूर (40 प्रती),
महालेखापाल (लेखा परीक्षा)-2, महाराष्ट्र, नागपूर (40 प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (40 प्रती),
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई (5 प्रती),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उपमुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
* प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
मंत्रालयातील सर्व विभाग,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
वित्त विभागातील सर्व कार्यासने (ग्रंथपाल 5 प्रती),
निवड नस्ती, कार्यासन सेवा-4.

* पत्राद्वारे.

---

प्रति

क्रमांक / नि.वे / विलंब / क-3 / ...
पुणे दिनांक २८-८-९७
28 AUG 1997

उप संचालक लेखा आणि कोषागारे
पुणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

प्रत - यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी त्यांनी सदर परिपत्रक त्यांच्या अधिनस्त कार्यालयाला पुरवावयाचे .

संचालक
लेखा व कोषागारे, पुणे
यांचे करिता

व. लि. का. अ. अ. 3

DISPATCHED ON 28 AUG 1997

एच-495(13,000+40-6-97)

8066